“स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच.डी (Ph.D.)पदवीच्या नोंदणीसाठी सादर करावयाचा नियोजित संशोधन प्रकल्प आराखडा.”

“ नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्रांना केलेल्या पतपुरवठयाचे विश्लेषणात्मक अध्ययन .”

(इ.स. २००० ते इ.स. २०१५)

(सामाजिक शास्त्रे विद्या शाखेच्या अर्थशास्त्र विषयात पीएच.डी पदवीसाठी)

अभ्यासक

स्वाती विकासराव कुरमे

एम.ए. एम.फिल. (अर्थशास्त्र) बी.एड.

ता.किनवट जि.नांदेड.

मो.नं. (९४०३९१८६४९)

मार्गदर्शक

डॉ. के. के. पाटील

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी.

(मार्च २०१६)

१) प्रस्तावना :

जगामध्ये जलदगतीने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेत भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थान अग्रक्रमाचे आहे. भारतात द्वितीय आणि तृतिय क्षेत्रांची प्रगती झाली असली तरी प्राथमिक क्षेत्र हेच भारतीय अर्थव्यस्थेचा मुख्य आधार आहे. प्राथमिक क्षेत्र देशाला अन्नधान्य उपलब्ध करुन देते तर दुसऱ्या बाजुने द्वितीय क्षेत्राला कच्च्या मालाचा पुरवठा करते. एकूण लोकसंख्येपैकी ५७% लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून आहे. या हेतूने प्राथमिक क्षेत्रांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. प्राथमिक क्षेत्रांचा विचार केल्यास यात कृषि, वनसंवर्धन, मासेमारी, खाण व दगडखाण इत्यादी व्यवसायाचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्राचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या रोजगार उपलब्ध करुन देण्यात खुप मोठा वाटा आहे. कोणतेही क्षेत्र असो त्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. भांडवलाच्या उपलब्धततेसाठी पतपुरवठयाची आवश्यकता भासते. जसे कृषिसाठी बी - बियाणे, जंतुनाशके, अवजारे, पेरणी, मशागत यंत्रे,जनावरे खरेदी, सिंचनाच्या सोयीसुविधा करिता भांडवलाची आवश्यकता भासते. त्याच प्रमाणे मासेमारी आणि खाणकाम आणि दगडखाणकाम करण्यासाठी त्यांना भांडवलाची आवश्यकता भासते. भारताचा विचार केल्यास हा देश विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. जास्तीत जास्त लोक हे खेडयात राहणारे आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे भांडवला करिता पुर्णस्त्रोत उपलब्ध नसतात. पतपुरवठयाची त्यांना आवश्यकता भासते. भारतातील पतपुरवठयाचा विचार केल्यास भारतातील जास्तीत जास्त लोक हे शेती किंवा इतर व्यवसाय करतात. त्यासाठी त्यांना भांडवलाची आवश्यकता असते.

यासाठी त्यांना पतपुरवठयासाठी जे स्त्रोत उपलब्ध होते ते म्हणजे खाजगी, सरकारी, सहकारी संस्था यासाठी भारत सरकारने सन १९५१ साली श्री ए.डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीची स्थापना केली. या समितीने अशी शिफारस केली की, ग्रामीण भागातील कर्जपुरवठयाची गरजपुर्ण करण्यास सरकारने इंपिरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करावे. या शिफारशीला अनुसरुन भारत सरकारने १९५५ साली संसदेमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट कायदा पास करुन घेतला. यामध्ये प्रत्यक्षरित्या श्री सी.डी.देशमुख यांनी १ जुलै १९५५ रोजी इंपिरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँक ऑफ इंडिया दुय्यम बँक कायदा संमत करण्यात आला. या कायदयानुसार संस्थानातील बँका स्टेट बँकेच्या सहयोगी बँका म्हणून घोषीत करण्यात आल्या.

या बँकामध्ये स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, स्टेट बँक ऑफ इंदोर, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, स्टेट बँक ऑफ म्हैसुर, स्टेट बँक ऑफ पतियाला, स्टेट बँक ऑफ सौराष्ट, स्टेट बँक ऑफ बिकानेर ॲण्ड जयपुर, याचा समावेश होतो. स्टेट बँक ऑफ इंडिया व तिच्या सहयोगी बँका मिळून स्टेट बँक गट असे नाव देण्यात आले. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठा गट म्हणून स्टेट बँक ऑफ इंडिया नावारुपास आली. जागतिक पातळीवर सर्वात जास्त शाखा असणाऱ्या मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाचा प्रथम क्रमांक आहे. आणि तिच्या शाखा मध्ये वाढ होत आहे. १९६९ - १९७० मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १५७२ शाखा होत्या त्या वाढून १९९५ -१९९६ मध्ये ८८८५ इतक्या झाल्या. २०१२ -२०१३ मध्ये शाखांची संख्या १४३१६ इतकी झाली आहे. शाखामध्ये दिवसेंदिवस जास्तीची वाढ होत आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ठेवीचा विचार केल्यास १९५५ - १९५६ मध्ये एकूण ठेवी २२६ कोटी इतक्या होत्या. त्यामध्ये वाढ होऊन २०१२-२०१३ मध्ये एकूण ठेवी १२,०२,७३९ कोटी इतक्या झाल्या. लाभाचा विचार केला असता १९९० -९१ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाला ८५ कोटी रुपये निव्वळ लाभ झाला. त्यामध्ये वाढ होऊन २०१२ - २०१३ मध्ये १४,१०५ कोटी इतका निव्वळ लाभ झाला.

२०१३ - २०१४ ची एकूण संपत्ती २१३६१३३ कोटी इतकी आहे. आधुनिकरण आणि प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यात स्टेट बँक ऑफ इंडिया अग्रेसर आहे. स्वतःच्या ग्राहकांना इंटरनेट, बँकीग, ऑनलाईन पेमेंट, क्रेडिट कार्ड,.स्वीफ्टकार्ड इत्यादी सेवा पुरविते. स्टेट बँक ऑफ इंडियाद्वारे प्राथमिक क्षेत्राला करण्यात येणाऱ्या पतपुरवठयाचे अवलोकन केले असतता असे दिसून येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया प्राथमिक क्षेत्राला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही मार्गाने पतपुरवठा करत आहे. बँकेच्या एकूण शाखा पैकी ५०५ शाखा ग्रामीण भागात आहे. अग्रणी बँक योजनेनुसार स्टेट बँक ग्रुप ९० जिल्हयांचा सर्वेक्षणाचे काम करत आहे. ५०,००० खेडी स्टेट बँकेच्या कार्यक्षेत्राखाली येतात. प्राथमिक क्षेत्राला पतपुरवठा करण्यात स्टेट बँक ऑफ इंडिया अग्रेसर आहे. यावरुन आपल्या लक्षात येते की, स्टेट बँक ऑफ इंडियाचा प्राथमिक क्षेत्राना पतपुरवठा करण्यात प्रथम क्रमांक लागतो. त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे जरुरी आहे. म्हणून **“नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्रांना केलेल्या पतपुरवठयाचे विश्लेषणात्मक अध्ययन (इ.स. २००० ते २०१५)”** या विषयाची निवड केली आहे.

नांदेड जिल्हयात स्टेट बँक ऑफ इंडिया अशा प्रकारे पतपुरवठा करते आहे परंतू त्यांचा लाभार्थ्यांनी लाभ घेतला किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाचे उद्दिष्टे पुर्ण झाले किंवा नाही याची

पाहणी करने तसेच प्राथमिक क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासन कोटयावधी रुपये खर्च करित आहे, त्याचे यथोचित मुल्यमापन करणे गरजेचे आहे. म्हणून या विषयाची निवड केली आहे.

<u>२) संशोधनाची आवश्यकता :-</u>

नांदेड जिल्हा कृषिप्रधान विभाग म्हणून ओळखला जातो. या भागात एकूण २६ शाखांचा समावेश होता. या शाखाद्वारे नांदेड जिल्हयात स्टेट बँक ऑफ इंडिया कशा पध्दतीने प्राथमिक क्षेत्रांना पतपुरवठा करित आहे, आणि पतपुरवठयाच्या बदलांच्या प्रवृत्तीचा आढावा घेण्यासाठी प्रस्तृत अध्ययन विषयाची निवड करण्यात आली आहे.

<u>३) संशोधन पध्दती :-</u>

“नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्रांना केलेल्या पतपुरवठयाचे विश्लेषणात्मक अध्ययन (इ.स. २००० - २०१५)”

या संशोधनासाठी जी उद्दिष्टे, गृहितके आणि पध्दती वापरण्यात येणार आहेत ती पुढील प्रमाणे आहेत.

<u>३.१) संशोधनाची उद्दिष्टे :-</u>

“नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्रांना केलेल्या पतपुरवठयाचे विश्लेषणात्मक अध्ययन (इ.स. २००० - २०१५)” या संशोधनासाठी खालील उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहे.

१) नांदेड जिल्हयातील प्राथमिक क्षेत्रांना पतपुरवठयासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

२) प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठयाच्या संदर्भात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आणि शासनाच्या धोरणांचे अध्ययन करणे.

३) स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्राला दिलेल्या एकूण कर्जाचे जिल्हा निहाय अध्ययन करणे.

४) स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्राला दिलेल्या कालनिहाय कर्जाचे जिल्हा निहाय अध्ययन करणे.

५)	नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्राथमिक क्षेत्राच्या पतपुरवठयाची वसुली आणि थकबाकीचे प्रमाण अजमावणे.

६)	प्राथमिक क्षेत्रातील व्यवसायांचा अभ्यास करणे.

७)	स्टेट बँक ऑफ इंडिया द्वारे प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठयाची अंमलबजावणी करत असतांना येणाऱ्या अडीअडचणी व समस्यांचा अभ्यास करणे आणि त्यावर उपाययोजना सुचविणे.

८)	प्राथमिक क्षेत्राद्वारे लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना येणाऱ्या अडीअडचणीचा व समस्यांचा अभ्यास करणे आणि त्यावर उपाययोजना सुचविणे.

३.२ गृहितके :-

"नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्रांना केलेल्या पतपुरवठयाचे विश्लेषणात्मक अध्ययन (इ.स. २००० - २०१५)" या संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहे.

१)	स्टेट बँक ऑफ इंडियाने प्राथमिक क्षेत्रांना पतपुरवठा केल्यामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा होत आहे.

२)	स्टेट बँक ऑफ इंडिया मार्फत प्राथमिक क्षेत्रांना पतपुरवठा केल्यामुळे लाभार्थ्यांची सावकारी पाशातून मुक्तता होत आहे.

३)	स्टेट बँक ऑफ इंडियाद्वारे नांदेड जिल्हयात करण्यात येणाऱ्या प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठयात वाढ होत आहे.

४)	स्टेट बँक ऑफ इडियाद्वारे नांदेड जिल्हयात प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठयात कृषी वगळता इतर व्यवसायात लाभ घेण्याचे प्रमाण कमी आहे.

५)	प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठयामुळे त्यांना आर्थिक सहाय्य मिळून कर्ज घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ होत आहे.

६)	प्राथमिक क्षेत्रांच्या पतपुरवठयामुळे लाभार्थ्यांच्या उत्पादनात वाढ होत आहे.

३.३ संशोधन अभ्यास पध्दती :-

प्रस्तृत संशोधनासाठी पुढील स्त्रोताद्वारे माहितीचे संकलन केले जाईल.

१) प्राथमिक स्त्रोत :-

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची मुलाखती द्वारे माहिती सकंलीत केली जाईल आणि लाभार्थ्यांची प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित केली जाईल. प्रत्यक्ष पाहणी, तपासणी आणि निरिक्षण केले जाईल.

२) द्वितीयक स्त्रोत :-

अग्रणी बँकेचे वार्षिक अहवाल, स्टेट बँक ऑफ इंडियाचे वार्षिक अहवाल, रिझर्व्ह बँकेचे विविध रिपोर्ट, रिझर्व्ह बँकेतर्फे नेमण्यात आलेल्या विविध साहित्याचे अहवाल, भारत सरकारने बँकिग क्षेत्रांत नेमलेल्या विविध समित्याचे अहवाल, विविध परिषदा, चर्चासत्र, कार्यशाळा, अन्यसंबंधीत प्रकाशने, संशोधन साहित्य, संशोधन पत्रिका, इंटरनेट, वर्तमानपत्रे तसेच शासनाचे वेळोवेळी निघालेले परिपत्रके.

सदरील अभ्यासक्रमाला अचुक दिशा देण्यासाठी काही महत्त्वपुर्ण सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल.

३) संशोधनाचा आराखडा :-

ज्या विषयाची निवड केली आहे. त्यांची माहिती संकलित केल्यानंतर त्यांची प्रत्यक्ष पाहणी, तपासणी आणि निरिक्षण केले जाईल. त्या संशोधनासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि निदानात्मक आराखडयाचा उपयोग केला जाईल.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संबंधित अधिकारी, कर्मचारी याची मुलाखती द्वारे माहिती संकलित केली जाईल. प्राथमिक क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांची प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केल्या जाईल

१) **नमुना निवड पध्दती :-**

प्रस्तृत संशोधनासाठी लॉटरी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड केली जाईल. नांदेड जिल्हयात एकूण २६ शाखा आहेत. त्या २६ शाखेचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या तालुका निहाय शाखांचे विवरण आणि स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अंतर्गत येणाऱ्या सेवा अंतर्गत गावांची संख्या खालील तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता १.१

अ.क्र	नांदेड जिल्हयातील एकुण तालुके	नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा	नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अंतर्गत येणाऱ्या सेवाअंतर्गत गावांची संख्या
१)	किनवट	किनवट मांडवी	१८ २२
२)	माहूर	माहूर	२०
३)	बिलोली	बिलोली कुंडलवाडी	२० १७
४)	देगलुर	देगलूर	२०
५)	धर्माबाद	धर्माबाद	२०
६)	हदगाव	हदगाव	२१
७)	कंधार	कंधार	२१
८)	हिमायतनगर	सरसम हिमायतनगर	१६ १८
९)	अर्धापुर	मालेगाव अर्धापुर	१८ २०
१०)	लोहा	सोनखेड लोहा	१८ २०
११)	भोकर	भोकर	२१
१२)	नायगाव	नायगाव	२०
१३)	पेठउमरी	पेठउमरी	१८
१४)	मुदखेड	मुदखेड	१८
१५)	नांदेड	नवा मोंढा डॉ.लाईन यशवंत नगर तरोडा नाका विष्णुपूरी तुप्पा बाभुळगाव	१८ २० १३ १८ १९ २० २१
	एकूण	**२६**	**५००**

वरील तालिकेवरुन तालुका निहाय स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा आणि स्टेट बँक ऑफ इंडिया अंतर्गत येणारी सेवाअंतर्गत गावे दर्शविली आहे. त्यांची नमुना निवड १०% प्रमाणे केलेली आहे.

तक्ता १.२

अ.क्र.	स्टेट बँक ऑफइंडिया अंतर्गत येणारी सेवा अंतर्गत गावे	नमुना पध्दती	नमुना पध्दती नुसार सेवा अंतर्गत आलेली गावे	सरासरी निवड
१	५००	लॉटरी पध्दती	५०	१०%

अशा प्रकारे प्रस्तृत संशोधनासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया अंतर्गत येणाऱ्या सेवा अंतर्गत गावांची निवड लॉटरी पध्दतीने केली जाईल. आठी दिशांना न्याय मिळेल या प्रमाणे गावांची निवड केली जाईल.

प्राथमिक क्षेत्रा अंतर्गत ज्या व्यवसायांना पतपुरवठा केला जातो. त्या प्राथमिक क्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांची निवड पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

तक्ता १.३

नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा	प्राथमिक क्षेत्रातील लाभार्थी संख्या	सरासरी निवड	लाभार्थी संख्या
२६	१५३४०	३%	४६०

अशा पध्दतीने प्रस्तुत संशोधनासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया अंतर्गत प्राथमिक क्षेत्रातील लाभार्थ्यांची निवड करुन माहिती संकलित केली जाईल. तसेच प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी, तपासणी आणि निरिक्षण केले जाईल.

३.४ संशोधनाच्या मर्यादा :-

१) स्टेट बँक ऑफ इंडिया द्वारे लाभ घेतलल्या लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्यामूळे सर्व लाभार्थ्यांचा प्रत्यक्ष प्रतिसाद घेणे अवघड आहे. तरीपण जास्तीत जास्त प्रमाणात लाभार्थ्यांची प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केली जाईल.

२) संशोधनाचे कार्यक्षेत्र नांदेड जिल्हया पुरते मर्यादीत आहे. यामध्ये १६ तालुके आणि १६४५ गावे आहेत त्यामध्ये १६ तालुक्यात एकूण स्टेट बँक ऑफ इंडियाच्या २६ शाखा आहेत. तरी प्रत्येक शाखेचा अभ्यास करुन प्रत्येक तालुक्याला न्याय देऊन परिक्षण केल्या जाईल

४. प्रकरणाची रुपरेषा

प्रकरण पहिले - प्रस्तावना

पार्श्वभुमी, इतिहास, स्थापना, उद्देश, संशोधनाची आवश्यकता, विषयाची निवड, संशोधन पध्दती, माहितीचे स्त्रोत, बँकेच्या शाखांची निवड, आकडेवारी विश्लेषण, सांख्यिकीय साधने, संशोधनाची उद्दीष्टे, संशोधनाची गृहीतके, प्रकरणाची रुपरेषा, अध्ययनाच्या मर्यादा इत्यादींचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण २ रे - संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या संदर्भातील विविध कायदे व त्यात वेळोवेळी झालेल्या बदलांचा आढावा घेणे व स्टेट बँक ऑफ इंडिया व त्या अनुषंगाने झालेल्या विविध संशोधनाचा परामर्श घेण्यात येईल.

प्रकरण ३ रे - नांदेड जिल्हयातील अधिकोषण प्रणाली

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्हयाची पार्श्वभुमी, भौगोलीक व आर्थिक वैशिष्टये, नांदेड जिल्हयातील अधिकोषण व्यवस्थेअंतर्गत राष्ट्रीयीकृत व इतर बँका, सहकारी बँकाच्या सांख्यिकीय व वित्तीय स्थीतीचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण ४ थे - प्राथमिक क्षेत्र आणि त्यातील व्यवसाय

प्राथमिक क्षेत्रातील जसे की, कृषी, मासेमारी, खाण व दगड खाणकाम, जंगलातील व्यवसाय यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण ५ वे - स्टेट बँक ऑफ इंडिया आणि प्राथमिक क्षेत्र

प्रस्तुत प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या योगदानाचा अभ्यास, स्टेट बँक ऑफ इंडिया द्वारे पत पुरवठयाच्या संदर्भात राबविण्यात येणा-या विभिन्न योजनांचा आढावा, नांदेड जिल्हयातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एकुण ठेवी, एकुण पतपुरवठा, कालनिहाय प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठा, शाखानिहाय प्राथमिक क्षेत्रातील पतपुरवठा, शाखानिहाय वसुली, एकुण वसुली, थकबाकी यांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ६ वे - सर्वेक्षण २०१४ - २०१५

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास कालावधी दरम्यान निवडलेल्या प्राथमिक क्षेत्रातील लाभार्थ्यांची प्रश्नावली द्वारे माहिती संकलित करण्यात येईल.

प्रकरण ७ वे - निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ सुची :

१) डॉ.सुधिर बोधनकर, प्रा.विवेक, समाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९९९)

२) बॅकिग - प्राध्यापक भोसले / काटे

३) डॉ. देसाई, डॉ. निर्मल भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन २००४

४) प्रा.ए.आर. रायखेलकर, डॉ.बी.एच. दायजी, औद्योगिक अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन पब्लिकेशर्स २००५

५) प्रा.एस.एम.कोलते, भारतीय बँकिंग प्रणाली, प्रशांत पब्लिकेशन २०१४

६) वार्षिक ऋण योजना २०१४ - २०१५ अग्रणी बॅक जिल्हा नांदेड.

७) नांदेड जिल्हयातील सर्व स्टेट बँक ऑफ इंडियाचे वार्षिक अहवाल

८) मुक्त ज्ञानकोष विकीपिडीया - From Internet

९) Agricultural Finance - Dr.B.I.Mathur

१०) Indian Economy - Datta / Sundaram

११) Indian Economy - Misra / Puri

१२) Various Issues of the Economic & Political Weekly

१३) Various Issues of the Indian Banking Association - Bulletin.

१४) Various Issues of the Socio - Economic Survey of Nanded Districts.

१५) Various Issues of the report on Currency & finance.

१६) Source - RBI Circular

१७) Priority Sector Leading Targets & Classification - From internet

१८) http : // www.rbi.org.in

संशोधन मार्गदर्शक

डॉ.के.के.पाटील
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय,
परभणी.

संशोधक विद्यार्थी

स्वाती विकासराव कुरमे
एम.ए., एम.फिल अर्थशास्त्र,
एम.ए.समाजशास्त्र,
बी.कॉम., बी.एड.
मु.पो.किनवट, ता.किनवट जि.नांदेड